# अमरावती महानगरपालिका, ~~अमरावती~~

## स्वच्छता विभाग

## कोटेशन सूचना

क्रमांक : ____________________ दिनांक : 15 / 9 / २०२६

**विषय :- श्रीगणेशोत्सव २०२६ च्या अनुषंगाने निर्माल्य संकलनासाठी अंदाजे १,००० लिटर क्षमतेचे निर्माल्य कलश खरेदी करण्यासाठी दरपत्रक / कोटेशन सादर करण्याबाबत.**

श्रीगणेशोत्सव २०२६ च्या अनुषंगाने अमरावती शहरातील विविध भागांमध्ये गणेशोत्सव कालावधीत नागरिकांकडून निर्माण होणारे निर्माल्य स्वतंत्रपणे संकलित करून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट / व्यवस्थापन करता यावे, तसेच निर्माल्य नदी, नाले व इतर नैसर्गिक जलस्रोतांमध्ये टाकले जाणार नाही यासाठी अमरावती महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागामार्फत विविध ठिकाणी **निर्माल्य कलश** उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे साहित्याचा पुरवठा करण्यासाठी पात्र उत्पादक / अधिकृत वितरक / पुरवठादार यांचेकडून प्रति नग दराने सीलबंद कोटेशन / दरपत्रक मागविण्यात येत आहे.

**१. साहित्याचा तपशील**

| अ.क्र. | साहित्याचे नाव व तांत्रिक तपशील | अपेक्षित संख्या | दर प्रति नग |
|---|---|---|---|
| १ | **निर्माल्य कलश**, अंदाजे **१,००० लिटर क्षमतेचा**, मजबूत, टिकाऊ, हवामानास प्रतिरोधक, Leak Proof व सार्वजनिक ठिकाणी निर्माल्य संकलनासाठी योग्य, झाकणासहित | **१० नग** | ₹ ________ |

**टीप** :- कोटेशनमध्ये दर प्रति नग नमूद करणे बंधनकारक राहील.

**२. निर्माल्य कलशाची किमान तांत्रिक वैशिष्ट्ये**

पुरवठा करण्यात येणारा प्रत्येक निर्माल्य कलश खालील किमान तांत्रिक निकषांची पूर्तता करणारा असणे आवश्यक आहे :-

1. निर्माल्य कलशाची क्षमता अंदाजे **१,००० लिटर** असावी.
2. कलश मजबूत, टिकाऊ व दीर्घकाळ वापरण्यास योग्य असावा.
3. कलश **Leak Proof** असावा.
4. सार्वजनिक ठिकाणी निर्माल्य संकलनासाठी योग्य असावा.
5. कलशास योग्य आकाराचे व सुरक्षित **झाकण** असणे आवश्यक आहे.
6. निर्माल्य टाकणे व संकलन करणे नागरिकांना सुलभ होईल अशी रचना असावी.
7. कलशाची रचना अशी असावी की त्यामधून निर्माल्य बाहेर पडणार नाही किंवा परिसरात पसरणार नाही.
8. कलश सहजपणे स्वच्छ करता येण्याजोगा असावा.
9. कलश हलविणे, वाहतूक करणे व आवश्यकतेनुसार विविध ठिकाणी ठेवणे सुलभ असावे.
10. कलश सार्वजनिक ठिकाणी ठेवण्यासाठी सुरक्षित व स्थिर असावा.
11. कलशाची गुणवत्ता व मजबुती समाधानकारक असणे आवश्यक राहील.
12. पुरवठादाराने कलशाची क्षमता, साहित्याचा प्रकार व तांत्रिक तपशील कोटेशनमध्ये स्पष्टपणे नमूद करावा.
13. आवश्यक असल्यास कलशाची प्रतिमा / तांत्रिक माहितीपत्रक / Specification Sheet कोटेशनसोबत सादर करावे.

**३. पुरवठ्याचा व्याप्ती**

पुरवठादाराने मंजूर दरामध्ये खालील सर्व बाबींचा समावेश करणे बंधनकारक राहील :-

Scanned with OKEN Scanner